१०१०/


महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १२३/प्रनिप्रा/१२१५ दिनांक : 23 MAY 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, **दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ४३ व ४८ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व २) डॉ. प्रमोद नाईक, प्र. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालाय, मुंबई हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.व ४) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व ५) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई, २) डॉ. गोविंद रेणूकादासराव संगवई, सहाय्यक संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) श्री. एन.बी. पाटील, प्रणाली विष्लेषक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) श्री. विजय सकपाळ, परिक्षा समन्वयेक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १३/०४/२०२२ | दुपारी १२:०० वा. | तंत्र शिक्षण | थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र |
| | | दुपारी ०३:०० वा. | कला शिक्षण | पदवी कला शिक्षण |

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ७/४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये तसेच कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी अनुक्रमे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र आणि कला शिक्षण या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार तंत्र शिक्षण संचालनालय व कला शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितीतील उक्त नमूद अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवाल प्राधिकरणास सादर केला आहे.

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी व्यावसायिक थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र आणि पदवी कला शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले, तसेच अभ्यासक्रम / महाविद्यालय निहाय प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ड) मधील निर्देशास अनुसरुन निवडक पध्दतीने छाननी करण्यात आली व तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये शासकीय / अशासकीय अनुदानित महाविद्यालये वगळून, इतर सर्व महाविद्यालये/संस्थांकडून "प्रक्रिया शुल्क" वसूल करण्यात यावे.

तसेच कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितीतील विविध अभ्यासक्रमांच्या शासकीय / शासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी व प्रक्रिया शुल्क संदर्भात शासनाचे कोणतेही निर्देश नसल्याने संबंधीत अभ्यासक्रमांच्या सर्व शासकीय / शासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांना प्राधिकरणाकडून प्रवेश मान्यतेची प्रक्रिया तसेच प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील, असे निर्णय घेण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश पडताळणी प्रकरणी संचालनालय, कला शिक्षण, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी कला शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी / छाननी गांर्भीयाने केली नसल्याचे निर्दशनास येत आहे, ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून, प्राधिकरण याची नोंद घेत आहे. तसेच भविषयात असे पुन्हा होऊ नये याकरिता त्यांना समज देण्याबाबत आणि या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सदरील बाब शासनाच्या निर्देशनास आणून दयावी, असे निर्देश देण्यात आले.

३) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र आणि पदवी कला शिक्षण या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे, अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची तात्पुरती मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये | शासकीय / अनुदानित / अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये (प्रपत्र-अ) | | अमान्य प्रवेश (प्रपत्र-ब) | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-क) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १) | थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी | ३२९ | १३ | १०७० | ९० | १३८८६ | २२६ | ९० | १९ | ४४९०२ |
| २) | थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र | ३२० | ९ | ११६ | ९८ | १९८१ | २१३ | ०१ | ०५ | ३८८८ |
| | पदवी कला शिक्षण | ११ | ०० | ०० | ०४ | ३७७ | ०७ | १२ | ०० | ४०२ |
| | **एकुण :** | **६६०** | **२२** | **११८६** | **१९२** | **१६२४४** | **४४६** | **१०३** | **२४** | **४९१९२** |

उक्त तालिकेतील अभ्यासक्रम व महाविद्यालय निहाय तपशीलवार माहिती प्रपत्र - 'अ', 'ब' व 'क' मध्ये सोबत जोडलेली आहे.

तालिकेतील दर्शविलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत,-

१) उक्त तालिकेतील स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेली महाविद्यालये (प्रपत्र-अ) शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या संदर्भात शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले असल्याने संबंधीत शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) उपरोक्त शासनाच्या पत्राच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये शासकीय / अशासकीय अनुदानित, अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये / संस्थाकडून (विनाअनुदानित / विद्यापीठ संचलित / विद्यापीठ विभाग) यांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. उक्त स्तंभ क्रमांक ६ मधील ज्या महाविद्यालयांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा केला नाही, अशा महाविद्यालयांनी लवकरात लवकर "प्रक्रिया शुल्काचा" भरणा करण्याबाबत कळविण्यात यावे. <u>प्रपत्र-</u>ब मधील महाविद्यालयांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्यानंतर व अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार रितसर प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) श्री. साई सामाजिक विकास संस्था संचलित, श्री साई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, परदरी, ता. - जिल्हा : औरंगाबाद (संकेतांक क्रमांक २१४१) या संस्थेचा तपासणी अहवाल संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी ऑफलाईन तपासून सादर केला आहे. या संस्थेमध्ये एकुण १०७ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत. या संस्थेची संलग्नता डॉ. बाबासाहेबत आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेकडून रद्द करण्यात आल्यामुळे व संस्थेत अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील सर्व वर्गात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे स्थलांतरण विद्यापीठाने केल्यामुळे या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या मान्यतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. असे संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ७/०४/२०२२ रोजीच्या तपासणी अहवालात नमुद करण्यात आले आहे.

वरील बाबींचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने ज्या संस्थामध्ये स्थलांतरीत केलेले आहे. अशा संस्थाकडून या विद्यार्थ्यांचा प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव,स्वतंत्रपणे स्विकारुन तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी पडताळणी करावी व तसे संबंधीत महाविद्यालयांना कळवावे, प्रस्तूत प्रकरणी सदरील पडताळणी झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाचा निर्णय घेण्यात येईल.

या विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव तपासणी अहवाल व प्रक्रिया शुल्का सहीत प्राप्त प्रस्ताव प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावेत.

४) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३१/०३/२०२२ रोजीच्या तपासणी अहवालानुसार संस्था कोड ४१७१ : प्रियदर्शनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नोलॉजी, नागपुर व ४१७९ : प्रियदर्शनी इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नागपुर या दोन संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर यांनी संस्था कोड ४१२३ : प्रियदर्शनी कॉलेज ऑफ इंजिनियरींग नागपुर या संस्थेत विलिन करण्यात आल्याचे नमूद केले आहे, त्यामुळे संस्था कोड क्रमांक ४१७१ व संस्था कोड ४१७९ या संस्थेत थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्था कोड ४१२३ या संस्थेत समजण्यात येऊन या सर्व तीन संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्था कोड क्रमांक : ४१२३ या संस्थेत एकत्रित प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

५) स्तंभ क्रमांक ८ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांची <u>प्रपत्र-क</u> अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत त्यामुळे सदरील प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या संदर्भात मा.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या (प्रपत्र-क नुसार) प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ नुसार) कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा कडून घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षांचे वेळापत्रक.**

आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रायोगिक तत्वावर सादर केलेल्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांचे वेळापत्रकाची नोंद घेण्यात आली (प्रपत्र - ड). सदरील वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती प्राधिकरणास अवगत करण्याचे निर्देश देण्यात आले.

पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रकरणी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी केलेली कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे (प्रपत्र - इ)

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, कला शिक्षण संचालनालय, मुंबई व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 23 MAY 2022